Whereas in the above noted case it has been proved to the satisfaction of the court that above named respondents cannot be served in the ordinary way of service. Hence, this publication under Order 5 Rule 20 CPC is hereby issued against respondents and respondents should appear personally or through their counsel on **22.07.2024 at 10 A.M.** before this Court, failing which ex-parte proceeding will be taken against him.

Given under my hand and seal of the court this 21st day of May, 2024

SEAL

(Prashant Singh Negi)
Senior Civil Judge,
Kasauli Distt Solan HP

E-AUCTION SALE NOTICE

ENRICH SHREYA MARINE INFRASTRUCTURES PVT LTD (IN LIQUIDATION)
(The Company was ordered into liquidation vide NCLT Mumbai Order Dated 27th February 2024) CIN:U74900MH2010PTC199727 (Established 04-02-2010)
Registered Address: 32/33, Gopal Bhuvan, 2nd Floor, 199, Princess Street, Mumbai-400002. Maharashtra

E-AUCTION

Notice is hereby given to the public in general under the Insolvency and Bankruptcy Code, 2016 and the regulations made thereunder Company debtor Enrich Shreya Marine Infrastructures Pvt Ltd (in Liquidation) is being Proposed to be sold as a going concern Regulation 32 (e) and 32A and for assignment of "Not Readily Realizable Assets" under Regulation 37A of the IBBI (Liquidation Process) Regulations,2016. The sale shall be conducted through e-auction platform without any kind of warranties and indemnities for the Asset-parcels at stated, as per below timelines given in the table, through the online e-auction service provider at http://www.eauctions.co.in/

Last date for Submission of Bid documents, Forms, Affidavits, Declaration etc. With EOI	12th July, 2024 (up to 5 PM IST)
Last date for due diligence of assets under auction	22nd July, 2024 (up to 5 PM IST)
Last Date for depositing EMD	25th July, 2024 (up to 5 PM IST)
Date and time of E-Auction	28th July, 2024 (11 A.M to 1 PM IST)

SN	Particulars of Assets	Reserve Price	EMD	Incremental Bid Amount
	Option A: Sale of Corporate Debtor as a Going Concern as per regulation 32 (e), 32A and 37 of IBBI (Liquidation Process) Regulations 2016 ongoing legal matters and NRRA Date and Time of Auction: 28th July, 2024 (11AM to 1 PM IST)			
1.	Sale of Corporate Debtor as a Going Concern as per Regulation 32 (e) and 32A of IBBI (Liquidation Process) Regulations 2016 including ongoing legal matters and NRRA	Rs. 50,00,000	Rs. 5,00,000	The Incremental bid Amount shall be Rs.5,000 per bid
	Option B: Assignment of Not Readily Realisable Assets as per Regulation 37 of IBBI (Liquidation Process) Regulations 2016 Date and Time of Auction: 28th July, 2024 (11AM to 1 PM IST)			

1.	Assignment of not readily realizable assets i.e. pending application under section 60(5), 45 and 50 of IBC 2016 before Hon'ble NCLT Mumbai Bench and Decree order	Offers are invited from Bidders for assignment of not readily realizable assets under Regulation 37A of The IBBI Liquidation Process Regulations, 2016.

Note: For Further clarification on the process please mail us on the email id. enrich.cirp@gmail.com

Sd/-
Hajari Lal Saini
Reg No. IBBI/IPA-001/IP-P01553/2019-20/12494
AFA Validity : 04.12.2024

Date : 28.06.2024
Place: Mumbai

केनरा बैंक Canara Bank

Matunga Bazar Branch (15039)
Shankar Mattam Building, Telang Cross Road, Matunga Bazar, Mumbai- 400 019.

DEMAND NOTICE [SECTION 13(2)

To,
Chhogaram Kalaramji Choudhary, S/o. Kalaramji Choudhary, B/301, Sahyadri Building, Vasant Nagri Sec 2, Nallasopara East,Vasai East, Virar, Palghar, Maharashtra - 401208.

Dear Sir,

Sub: - Demand Notice under Section 13(2) of the Securitization & Reconstruction of Financial Assets & Enforcement of Security Interest Act, 2002.

That **M/s. Heera Plast India** Prop.: Mr. Chhogaram Kalaramji Choudhary has availed the following loans / credit facilities from our Matunga Bazar Branch from time to time:-

No	Loan No	Nature of Loan/ Limit	Loan Amount	Liability as on 14.06.2024	Rate of Interest
1.	125003709435	MSME ODBD/ OCC	Rs. 50,00,000/-	Rs. 50,66,582.44	11.25 %+2.% penal int.
		TOTAL	Rs. 50,00,000/-	Rs. 50,66,582.44	

The above said loan/credit facilities are duly secured by way of mortgage of the assets more specifically described in the schedule hereunder, by virtue of the relevant documents executed by you in our favour. Since you had failed to discharge your liabilities as per the terms and conditions stipulated, the Bank has classified the debt as NPA on 08.06.2024. Hence, we hereby issue this notice to you under Section 13(2) of the subject Act calling upon you to discharge the entire liability of **Rs. 50,66,582.44 (Rupees Fifty Lakhs Sixty Six Thousand Five Hundred Eighty Two and Paisa Forty Four Only) as on 14.06.2024** with accrued and up-to-date interest and other expenses, within sixty days from the date of the notice, failing which we shall exercise all or any of the rights under Section 13(4) of the subject Act.

Further, you are hereby restrained from dealing with any of the secured assets mentioned in the schedule in any manner whatsoever, without our prior consent. This is without prejudice to any other rights available to us under the subject Act and/or any other law in force.

Your attention is invited to provisions of sub-section (8) of Section 13 of the SARFAESI Act, in respect of time available, to redeem the secured assets.

The demand notice had also been issued on **14/06/2024** to you by Registered Post Ack due to your last known address available in the Branch record.

SCHEDULE

The specific details of the assets Mortgaged/Hypothecated are enumerated hereunder:

S. No.	Detailed Description to be given
1.	All Part & Parcel of Property Bearing Industrail Gala No. 205, 2nd Floor, Hdil Industrial Park Building No. 20, Ad Measuring 37.08 Sqmt. (Carpet Area) Constructed On S. No. 136 (322) 3 Part, 138 (251) 4, Kjp New S. No. 123 Situated At Village Chandansar, Within Taluka Limits of Vasai And In The Registration District of Palghar And In The Sub Registration District of Vasai And In The Local Limits of Vasai Virar City Municipal Corporation. Name of Title Holder : **Chhogaram Kalaramji Choudhary**

Date : 25.06.2024
Place : Mumbai

Sd/-
Authorized Officer

केनरा बैंक Canara Bank

Lower Parel Branch : Unit No. 1, Ground Floor, Kamala Mills Compound, Times Tower, S. B. Road, Lower Parel (West), Mumbai - 400 013.

DEMAND NOTICE [SECTION 13(2)

To,

1. **Mrs. Khatija Mushtak A. Baghdadi,** D/o. Abdul Shaikh, R/o. Opp Eastern Chambers, House No. 121, Nandlal Jain Road, FCI Godown No. 8, Dongri, Mumbai, Maharashtra - 400009.
2. **Sh. Nasir Abdul Shaikh** (Guarantor) S/o. Abdul Shaikh, R/o. Opp Eastern Chambers, House No. 121, Nandlal Jain Road, Fci Godown No. 8, Dongri, Mumbai, Maharashtra - 400009.

Dear Sir,

Sub: - Demand Notice under Section 13(2) of the Securitization & Reconstruction of Financial Assets & Enforcement of Security Interest Act, 2002.

That **Mrs. Khatija Mushtak A. Baghdadi** has availed the following loans / credit facilities from our Lower Parel Branch from time to time:-

No.	Loan No.	Nature of Loan/ Limit	Loan Amount	Liability as on 13.05.2024	Rate of Interest
1.	160000559391	Housing Finance	Rs. 22,00,000/-	Rs. 21,75,126.72	9.45 %+2.% penal int.
		TOTAL	Rs. 22,00,000/-	Rs. 21,75,126.72	

The above said loan/credit facilities are duly secured by way of mortgage of the assets more specifically described in the schedule hereunder, by virtue of the relevant documents executed by you in our favour. Since you had failed to discharge your liabilities as per the terms and conditions stipulated, the Bank has classified the debt as NPA on **11.05.2024**. Hence, we hereby issue this notice to you under Section 13(2) of the subject Act calling upon you to discharge the entire liability of **Rs. 21, 75,126.72 (Rupees Twenty One Lakhs Seventy Five Thousand One Hundred Twenty Six and Paisa Seventy Two only) as on 13.05.2024** with accrued and up-to-date interest and other expenses, within sixty days from the date of the notice, failing which we shall exercise all or any of the rights under Section 13(4) of the subject Act.

Further, you are hereby restrained from dealing with any of the secured assets mentioned in the schedule in any manner whatsoever, without our prior consent. This is without prejudice to any other rights available to us under the subject Act and/or any other law in force.

Your attention is invited to provisions of sub-section (8) of Section 13 of the SARFAESI Act, in respect of time available, to redeem the secured assets.

The demand notice had also been issued on 14/05/2024 to you by Registered Post Ack due to your last known address available in the Branch record.

SCHEDULE

The specific details of the assets Mortgaged/Hypothecated are enumerated hereunder:

S. No.	Detailed Description to be given
1.	All That Part And Parcel of Property Bearing Details :- Residential Flat Bearing Flat No. 304, Admeasuring 337.99 Sq. Ft. Carpet Area On 3rd Floor In 'A' Wing of The Building Known As "Viviana Block 5" Constructed On Land Bearing Survey No. 87/43, 87/44, 87/45, 87/46 Situated At Village Dhamote, Taluka Karjat, District Raigad, Maharashtra - 410206. **Bounded As Follows:- North :** Open Land, **South :** Open Land, **East :** Road, **West :** Open Land. Name Of Title Holder: **Mrs. Khatija Mushtak A. Baghdadi**

Date : 25.06.2024
Place : Mumbai

Sd/-
Authorized Officer

‘रिफंड’साठी बँक खात्याचे ‘व्हॅलिडेशन’ महत्त्वाचे

बहुतांश नोकरदारांना कंपनीकडून फॉर्म १६ मिळाला असेल आणि अनेकांनी आयटीआर भरण्याची प्रक्रिया देखील सुरू केली असेल. आयटीआर भरताना आपल्या बँक खात्याचे व्हॅलिडेशन करणे महत्त्वाचे आहे. यासंदर्भात प्राप्तिकर खात्याने विशेष लक्ष देण्याची सूचना केली आहे. कारण एखाद्याचा रिफंड असेल आणि आयटीआर भरणाऱ्यांच्या बँक खात्यात बदल असेल तर रिफंडची प्रक्रिया पूर्ण करताना प्राप्तिकर खात्याला अडचणी येतात आणि परिणामी रिफंड मिळण्यास अडचणी येतात. म्हणून विशेष खबरदारीची सूचना केली आहे. आयटीआर भरण्याची शेवटची तारीख ३१ जुलै आहे. मात्र करदात्यांनी आयटीआरसाठी शेवटच्या दिवसांची वाट पाहू नये. तज्ज्ञांच्या मते, शेवटच्या क्षणी आयटीआर दाखल करताना चुका होण्याची शक्यता अधिक असते.

प्राप्तिकर खात्याकडून रिफंड मिळवण्यासाठी बँक खाते व्हॅलिडेटेड असणे गरजेचे आहे. कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे करदात्यांच्या बँक खात्याचे विवरण बदलते. नोकरीतील बदल, शहर बदल आदी. त्यामुळे बँक बदलते कधी बँकेची शाखा तर कधी बँकेचा आयएफएससी कोड बदलतो. अनेकदा तर दोन खात्यामुळेही विवरण देखील बदलते. अशावेळी करदात्याने बँक खात्यास रिव्हॅलिडेट करणे गरजेचे आहे. प्राप्तिकर खात्याने सोशल मीडियावर यासंदर्भात माहिती दिली आहे. ई फायलिंग पोर्टलवर रिफंडची प्रक्रिया सुलभपणे पार पाडली जावी यासाठी व्हॅलिडेशन स्टेट्स तपासण्याचेही निर्देश दिले आहेत.

Mahamoney.com

बँक खाते व्हॅलिडेशन प्रक्रिया

करदाते बँक खात्याला ऑनलाईनवर व्हॅलिडेट करू शकतात. त्याची प्रक्रिया खूपच सोपी आहे. यासाठी प्राप्तिकर खात्याच्या संकेतस्थळावर जावे लागेल. तेथे युजर आयडी, पासवर्डच्या मदतीने लॉग ईन केल्यानंतर प्रोफाईलवर लिंक करावे लागेल. त्यानंतर बँक खात्याची निवड करून 'रिव्हॅलिडेट'वर लिंक करावे लागेल. त्यानंतर खाते क्रमांक, आयएफएससी खात्याचा प्रकार अपडेट केल्यानंतर 'व्हॅलिडेट'वर लिंक करावे लागेल.

प्राप्तिकर विभागाने अलिकडेच सोशल मीडिया 'एस'वर एक पोस्ट केली असून, त्यात करदात्यांना आपले बँक खाते व्हॅलिडेट करण्याचे आवाहन केले आहे. कारण रिफंड मिळवण्यासाठी बँक खात्याचे व्हॅलिडेशन असणे महत्त्वाचे आहे.

नवीन बँक खाते जोडण्याची प्रक्रिया

नवीन खाते आयटीआरमध्ये नमूद करण्यासाठी प्राप्तिकर खात्याच्या संकेतस्थळावर जावे लागेल. प्रोफाईलवर लिंक करा आणि नंतर माय बँक अकाऊंटवर लिंक करा. आपल्याला अॅडेड, फेल्ड, रिमूव्हड बँक अकाउंट असे टॅब दिसतील. नवीन खाते जोडायचे असेल तर अॅड बँक अकाउंट टॅबची निवड करावी लागेल. त्यानंतर व्हॅलिडेटवर लिंक करा. म्हणजेच आपण कोणत्याही वेळी नवीन खाते आपल्या प्रोफाईलला जोडू शकता आणि जुने खाते डिलिट करू शकता. जुन्या खात्याला देखील व्हॅलिडेट करता येते.

मंत्री आतिशी यांना डिस्चार्ज

■ नवी दिल्ली

आपच्या नेत्या आणि दिल्लीच्या जलमंत्री आतिशी यांना आज सकाळी एलएनजेपी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. दिल्लीकरांच्या पाण्यासाठी उपोषण करणाऱ्या आतिशी यांची प्रकृती खालावली होती. त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

भाजपाशासित हरियाणाकडून दिल्लीच्या वाट्याचे पाणी मिळावे, या मागणीसाठी आतिशी यांनी बेमुदत उपोषण केले होते. मात्र, उपोषणाच्या पाचव्या दिवशी आतिशी यांची तब्येत खालावली होती.

रक्तातील साखरेची पातळी कमी झाल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुरुवातीला त्यांना रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये ठेवण्यात आले होते. त्यानंतर त्यांची प्रकृती सुधारल्याने त्यांना जनरल वॉर्डमध्ये हलवण्यात आले. आज सकाळी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला.

कुकडी प्रकल्पाच्या ५ धरणांनी ऐन पावसाळ्यात तळ गाठला

३.५२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक

■ पुणे

यंदा जून महिन्यात कुकडी प्रकल्पांतर्गत धरण पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झालेला नाही. यामुळे या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या पाच धरणांनी ऐन पावसाळ्यात तळ गाठला आहे. महिनाभरात कुकडी प्रकल्पाच्या उपयुक्त पाणीसाठ्यात केवळ १०० दशलक्ष घनफूट वाढ झाली आहे. सध्या या प्रकल्पात एक टीएमसी म्हणजे ३.५२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.



कुकडी प्रकल्पांतर्गत डिंभा, माणिकडोह, वडज, येडगाव, पिंपळगाव जोगा या धरणांचा समावेश होतो. प्रकल्पाची उपयुक्त पाणी साठवण क्षमता ३० टीएमसी आहे. धरणात पाणीसाठा होण्यासाठी मुसळधार पावसाची आवश्यकता आहे, अशी माहिती कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक एकचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडुसकर यांनी दिली. जून महिन्यात धरण पाणलोट क्षेत्रात आजअखेर सरासरी ६४ मिलिमीटर पाऊस झाला आहे. मागील वर्षी १५ ऑक्टोबर अखेर कुकडी प्रकल्पात २६.८२ टीएमसी म्हणजे १०.३८ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला होता. पाणीसाठा कमी असतानाही कुकडी पाटबंधारे विभागाने पाणी वाटपाचे योग्य नियोजन करून रब्बीचे एक व उन्हाळी दोन अशी तीन आवर्तने पूर्ण केली आहेत.



आषाढी एकादशीनिमित्त ठाण्यातून जादा बस धावणार

■ ठाणे

आषाढी एकादशी जवळ आल्याने भाविकांना विठूरायाच्या दर्शनाची आस लागली आहे. याच पार्श्वभूमीवर पंढरपूरला जाण्यासाठी एसटी महामंडळाच्या ठाणे विभागातून जादा बस सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. १३ जुलैपासून ठाणे जिल्ह्यातील सर्व आगारांतून पंढरपूरसाठी या जादा बस सोडण्यात येणार असून, १७ ते २२ जुलैदरम्यान पंढरपूरवरून त्या परतीच्या प्रवास करतील.

या जादा बसच्या प्रवासासाठी आरक्षणाची सोयही उपलब्ध करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, कल्याण, विठ्ठलवाडी, डोंबिवली, वाडा, शहापूर, मुरबाड, बोरिवली (नॅन्सी कॉलनी) स्थानकातून १३ जुलैपासून या जादा बस सोडण्यात येणार आहेत. तर १७ ते २२ जुलै या कालावधीत पंढरपूरमध्ये चंद्रभागा बस स्थानकातून परतीच्या प्रवासाच्या बस सोडण्यात येणार आहेत. त्याचबरोबर भिवंडीवरून १६ व १७ जुलै रोजी सकाळी ६ वाजता इंदापूर-पुणेमार्गे बस सुटेल. १६ जुलै रोजी सकाळी ७ वाजता माळशेजमार्गे पंढरपूरसाठी बस सुटेल. तर याच दिवशी सकाळी ८.३० वाजता भिवंडी, कल्याण, फलटणमार्गे पंढरपूरला जाण्यासाठी बस सुटणार आहे.

गोव्यात बोरी पुलाच्या उभारणीस लोटली ग्रामस्थांचा प्रखर विरोध

■ मडगाव

दक्षिण गोवा जिल्ह्यातील साष्टी तालुक्यातील लोटली ग्रामस्थांनी बोरी पुलाला प्रखर विरोध केला आहे. खाजण जमिनीवर हा पूल आणि महामार्ग उभारू नये, अशी या लोटलीकरांची मागणी आहे. त्यामुळे पुलाच्या सर्वेक्षणासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना ग्रामस्थांनी माघारी पाठवले.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राष्ट्रीय महामार्ग १७ बी या नव्या महामार्गासाठी आणि बोरी नदीवर पूल उभारला जात आहे. या कामासाठी लोटलीतील खाजण जमिनीतून भूसंपादन केले जात आहे. मंगळवारी सकाळी या कामाच्या सर्वेक्षणासाठी बांधकाम विभागाचे अधिकारी मोठा पोलीस फौजफाटा घेऊन लोटलीत आले होते. यावेळी ग्रामस्थांनी जोरदार विरोध त्यांचे काम बंद पाडले. पर्यावरण, वन आणि सीआरझेड दाखले घेतल्यावरच पुढील प्रक्रिया करावी, अशी भूमिका ग्रामस्थांनी यावेळी घेतली.

धारावीतील सर्वेक्षण सुरूच राहणार विरोधी याचिका हायकोर्टाने फेटाळली

■ मुंबई

धारावी बचाव आंदोलनाचे समन्वयक संजय भालेराव यांनी धारावीतील सर्वेक्षण प्रक्रिया ही आदर्श निवडणूक आचारसंहितेचा भंग करून सुरू करण्यात आली असून, त्याला तत्काळ स्थगिती द्यावी, अशी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली होती. मात्र ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे धारावीतील सर्वेक्षण प्रक्रिया यापुढे सुरूच राहणार आहे.

मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भालेराव यांनी मुंबई उच्च न्यायालयात धारावीतील सर्वेक्षण थांबविण्यात यावे, अशी मागणी करणारी याचिका दाखल केली होती. त्यावेळी न्यायालयाने याचिकेवर तातडीने सुनावणीस नकार देत कोणताही अंतरिम दिलासा दिला नव्हता. या याचिकेची सुनावणी नुकतीच न्यायमूर्ती कमल खाटा आणि एम. एस. सोनक यांच्या खंडपीठासमोर झाली. यावेळी खंडपीठाने स्पष्ट केले की, याचिकाकर्त्याला कोणताही अंतरिम दिलासा दिला नव्हता. त्यामुळे सर्वेक्षण सुरूच राहिले होते. आता तर निवडणूक प्रक्रिया देखील पूर्ण झालेली आहे. त्यामुळे या याचिकेवर कोणतीही कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे ही याचिका फेटाळण्यात येत आहे.

पुणे एक्स्प्रेस, निजामाबाद डेमू गाड्यांचे मार्ग बदलले

■ पुणे

दौंड ते मनमाड दरम्यान रेल्वेच्या दुहेरीकरणाचे काम सुरू असल्याने दक्षिण मध्य रेल्वेच्या पुणे एक्स्प्रेस आणि दौंड-निजामाबाद डेमू या गाड्यांसह अन्य काही गाड्यांचे मार्ग बदलले असून, काही गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

मध्य रेल्वे पुणे विभागातील दौंड आणि मनमाड विभागाच्या पुणतांबा आणि कान्हेगाव रेल्वे स्थानकादरम्यान दुहेरीकरणाच्या कामासाठी ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात आला आहे. यामुळे दक्षिण-मध्य रेल्वेच्या काही गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले असून, काही गाड्या अंशतः रद्द केल्या आहेत.

प्रवाशांनी बदललेल्या वेळापत्रकाची नोंद घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे. मार्गात बदल करण्यात आलेल्या गाड्यांमध्ये दौंड-निजामाबाद डेमू गाडी २६, २७, २८, २९ आणि ३० जूनपर्यंत कुरडूवाडी, लातूर, परळी, परभणी मार्गे धावेल. निजामाबाद-पुणे डेमू ही गाडी २५, २६, २७, २८ आणि २९ जूनपर्यंत परभणी, परळी, लातूर, कुर्डूवाडी मार्गे धावेल. पुणे -नांदेड एक्स्प्रेस २५, २६, २७, २८ आणि २९ जूनपर्यंत दौंड, कुर्डूवाडी, लातूर, परळी, परभणी मार्गे धावेल. नांदेड-पुणे एक्स्प्रेस ही गाडी २६, २७, २८, २९ आणि ३० जूनपर्यंत परभणी, परळी, लातूर, कुर्डूवाडी, दौंड मार्गे धावेल. सिकंदराबाद-श्री साईनगर शिर्डी एक्स्प्रेस २८ जून रोजी मनमाड ते श्री साईनगर शिर्डी दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली असून, ही गाडी सिकंदराबाद ते मनमाड अशी धावेल.

आईस्क्रीममधील बोटाचे गूढ उकलले तुटलेले बोट असिस्टंट ऑपरेटरचेच

■ मुंबई

काही दिवसांपूर्वी आईस्क्रीममध्ये सापडलेल्या बोटाचे गूढ उकलण्यात अखेर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी केलेल्या डीएनए चाचणीचा अहवाल आला असून, तुटलेले बोट आईस्क्रीम बनवणाऱ्या फार्च्युन कंपनीतील असिस्टंट ऑपरेटर ओमकार पोटे याचेच असल्याचे निष्पन्न झाले आहे.

मालाड येथील एक डॉक्टर ब्रेंडन फेरारो यांनी काही दिवसांपूर्वी ऑनलाईनवरून आईस्क्रीमचे ३ कोण मागवले होते. यापैकी आईस्क्रीममध्ये चक्क मानवी तुटलेले बोट सापडले होते. त्यामुळे मोठी खळबळ माजली होती. त्यानंतर या प्रकरणाची पोलिसांनी चौकशी सुरू केली होती. त्यात सुरुवातीला हे आईस्क्रीम बनवणाऱ्या युमो कंपनीची चौकशी करण्यात आली. त्यावर आम्ही फार्च्युन कंपनीकडून हे आईस्क्रीम मागवतो, असे युमोकडून सांगण्यात आले. त्यामुळे फार्च्युन डेअरीमध्ये जाऊन पोलिसांनी चौकशी केली असता तिथल्या ओमकार पोटे कर्मचाऱ्याचे अपघातात बोट तुटल्याचे आढळले. या बोटाची डीएनए चाचणी केली. त्याचा आज अहवाल आला.

शोक प्रस्तावानंतर विधानसभेचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित

■ मुंबई

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली आहे. या अधिवेशनात शुक्रवारी अर्थसंकल्प मांडण्यात येणार आहे. मात्र अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी केवळ तालिका अध्यक्षांची नियुक्ती आणि निधन पावलेल्या सदस्यांना शोक प्रस्ताव मांडून कामकाज स्थगित करण्यात आले.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली आहे. विधानसभेत कामकाजाच्या पहिल्या दिवशी आज विधानसभा सदस्यांनी लोकसभेची निवडणूक लढवण्यासाठी राजीनामे दिले होते. त्यांच्या राजिनाम्याची अधिकृत घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभेत केली. यावेळी आमदार निलेश लंके, राजू पारवे, वर्षा गायकवाड, रवींद्र वायकर, प्रतिभा धानोरकर, संदिपान भुमरे, बळवंत वानखडे, प्रणिती शिंदे या आमदारांनी राजीनामे दिल्याचे सभागृहात घोषित केले.

दरम्यान, पावसाळी अधिवेशनाच्या काळात सभागृहामध्ये तालिका अध्यक्ष म्हणून काही आमदारांच्या नावांची घोषणा विधानसभा अध्यक्षांनी केली. यामध्ये आमदार कालिदास कोळंबकर, आमदार संजय शिरसाट, आमदार अमिन पटेल आणि आमदार किरण लहामटे यांचा समावेश आहे. दरम्यान, विधिमंडळाच्या प्रथेप्रमाणे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहिली जाते. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिवंगत आमदार पी. एन. पाटील, प्रतापराव भोसले, मीनाक्षी पाटील, गंगाधर गाडे, त्र्यंबक कांबळे, दगडू गलांडे, डॉमनिक गोन्सालवीस, विश्वास गांगुर्डे आणि गंगाराम ठक्करवाड या माजी विधानसभा सदस्यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव सभागृहात मांडला. या शोक प्रस्तावानंतर विधानसभेचे दिवसभराचे कामकाज स्थगित करण्यात आले. शुक्रवारी दुपारी दोन वाजता राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प मांडण्यात येणार असल्याचे यावेळी विधानसभा अध्यक्षांनी घोषित केले.

पिंपळगाव बसवंत शहरात सफरचंदापेक्षा जांभूळ महाग

■ निफाड

उन्हाळा संपला तरी तालुक्यातील पिंपळगाव बसवंत शहरातील बाजारपेठेत लांबट आणि गोल जांभळे दाखल होताना दिसत आहेत. यंदा उत्पादन घटल्याने आवक कमी झाली आहे. त्यामुळे ही जांभळे सफरचंदापेक्षा महाग झाली आहेत. एक किलो जांभूळ २०० रुपये किलोने, तर सफरचंद १८० रुपये किलो दराने विकली जात आहेत.

शहरातील निफाड नाका, बसस्थानक आणि चिंचखेड चौफुली आदी भागात रस्त्याच्या कडेला जांभळांची विक्री केली जात आहे. यंदा प्रखर उन्हाळ्यात जांभळाचा फुलोरा जळून गेल्याने जांभळाची आवक घटली आहे. त्यामुळे जांभळाचे भाव दुपटीने वाढले आहेत. बाजारात रानमेवा म्हणून जांभळाची ओळख आहे. हा रानमेवा वनौषधी म्हणूनही उपयोगात आणला जातो.

जय पॅलेस्टाईन विरुद्ध राष्ट्रपतींकडे तक्रार असदुद्दीन ओवेसींची खासदारकी धोक्यात

■ नवी दिल्ली



लोकसभा सदस्यत्वाची शपथ घेताना, एमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी जय पॅलेस्टाईन असे म्हटले होते. त्याबद्दल अॅड. विनीत जिंदाल यांनी राष्ट्रपतींना पत्र लिहून ओवेसींची खासदारकी रद्द करण्याची मागणी केली आहे. माजी खासदार नवनीत राणा यांनीही राष्ट्रपतींना पत्र लिहून हीच मागणी केली आहे.

१८ व्या लोकसभेत हैदराबादमधून निवडून आलेले एमआयएमचे खासदार ओवेसी यांनी खासदारकीची शपथ घेताना जय हिंद, जय तेलंगणा, जयभीम आणि जय पॅलेस्टाईन असे म्हटले होते. त्यांनी जय पॅलेस्टाईन म्हटल्याबद्दल अनेक खासदारांनी नाराजी व्यक्त केली होती. तर अॅड. विनीत जिंदाल यांनी घटनेच्या कलम १०३ अन्वये राष्ट्रपतींना पत्र लिहून, संसदेत सदस्यत्वाची शपथ घेताना दुसऱ्या राष्ट्राचा जय म्हणून गौरव करणे हा कलम १०२ डी अन्वये गुन्हा आहे. त्यामुळे या गुन्ह्याअंतर्गत ओवेसी यांची खासदारकी रद्द करावी, अशी मागणी राष्ट्रपतींकडे केली आहे. लोकप्रतिनिधी कायद्यान्वये एखादा सदस्य मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असेल तर त्याला अपात्र करता येते. भारतीय नागरिक असताना दुसऱ्या देशाचे नागरिकत्व घेतले तर त्याला अपात्र ठरवता येते. एखाद्या लोकप्रतिनिधीला गंभीर गुन्ह्यांतर्गत न्यायालयाने दोषी ठरवले असेल तर अशा सदस्याला अपात्र ठरवता येते. कलम १०२ डी मध्ये लोकप्रतिनिधींना अपात्र करण्याची तरतूद आहे.

इंद्रायणीत 'छावा'चे जलसमाधी आंदोलन

■ आळंदी

इंद्रायणी नदीत रसायनमुक्त पाणी सोडले जात असल्यामुळे नदी फेसाळलेली आहे. याकडे सरकारकडून दुर्लक्ष केले जात आहे. याविरोधात छावा मराठा युवा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी आज सकाळी आळंदीमधील इंद्रायणी नदीपात्रात उतरत प्रतिकात्मक जलसमाधी आंदोलन केले. राज्यातील लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेली पवित्र अशी इंद्रायणी नदी पात्रात मैलामिश्रीत सांडपाणी आणि रसायनयुक्त पाणी सोडल्याने इंद्रायणी नदी पात्रातील वारकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. राज्यातील महायुती सरकार नदी प्रदूषणाकडे दुर्लक्ष करत असल्याने इंद्रायणी नदीची अशी दुरवस्था झाली आहे.

गणेशोत्सवाआधीच पुण्यात मेट्रो स्वारगेटपर्यंत धावणार

■ पुणे

गणेशोत्सवाआधीच पुणेकरांच्या सेवेसाठी भुयारी मार्गातून मेट्रो स्वारगेटपर्यंत धावणार आहे. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून, जुलैअखेरीस हे काम पूर्ण होणार आहे. त्यातच विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच हे काम पूर्ण करावे, असे महामेट्रोने नियोजन केले आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीमुळे महामेट्रो संचालकांनी पुण्यात अंडरग्राऊंड मेट्रो सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या मेट्रोचे काम अंतिम टप्प्यात आले असून, जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या मार्गावर बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट अशी तीन स्थानके असणार आहेत. ३.६४ किलोमीटरचा हा भुयारी मार्ग जिल्हा न्यायालय स्थानक ते बुधवार पेठ स्थानक मार्ग मुठा नदीपात्राच्या खालून जातो. त्यामुळे पुण्यात पहिल्यांदाच अशा प्रकारे नदीपात्राखालून मेट्रो धावणार आहे. मेट्रो मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांना तपासणीसाठी बोलाविण्यात येणार आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर मेट्रोकडून राज्य सरकारकडे ही सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

झिकाचा आणखी एक रुग्ण आढळला

पुणे- पुण्यातील हडपसर भागात झिका व्हायरसचा संसर्ग झालेला आणखी एक रुग्ण आढळला. या व्यक्तीच्या रक्ताच्या नमुन्यांची तपासणी केली असता प्राथमिक तपासणी अहवालामध्ये त्याला झिकाचा संसर्ग झाल्याचे उघड झाले. त्यामुळे आता पुण्यामध्ये झिकाच्या रुग्णांची संख्या ३ वर पोहोचली आहे. काल पुण्यातील एरंडवणा परिसरात झिका व्हायरसचे दोन रुग्ण आढळले होते. पुण्यामध्ये झिका व्हायरसच्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे टेन्शन वाढले आहे. महापालिकेकडून प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. पालिकेने शहरात अनेक ठिकाणी उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे.